MHRG190010432023

::<u>भूसंपादन निर्देशन अर्ज क्र.६८/२०२० मधील निशाणी क्र.३१ वरील आदेश</u> ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी मुळ अर्जातील अर्जदार क्र.५ ऐवजी अर्जदार क्र.३ असे लिहिण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्ज व सामनेवाला यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारतर्फे वकील आणि सामनेवाला तर्फे सहा.सरकारी वकील श्री.योगेश तेंडुलकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०३. अर्जदारचे कथन की, प्रस्तुत रेफरन्स अर्जातील अर्जदार यांचे श्री. रमेश शंकर नटे वगैरे यांचे नावाने कोर्टात इतर प्रकरणे दाखल असुन अर्जदार क्र.३ बारकु विश्राम नटे हे मयत असुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेताना मयत अर्जदार बारकु विश्राम नटे यांना नजरचुकीने अर्जदार क्र.५ असे संबोधण्यात आलेले आहे. सबब, मयत अर्जदार क्र.५ यांना मयत अर्जदार क्र.३ असे लिहिण्याची परवागनी मिळणेस विनंती केली आहे.

०४. याउलट सामनेवाला क्र.१ ते २ यांनी सदर अर्जास सक्त आक्षेप नोंदवुन अर्जास संयुक्तिक पुरावा दिलेला नसल्याने अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली. सामनेवाला क्र.३ यांनी सदर अर्जावर म्हणणे सादर करताना न्यायालयाचा बहुमुल्य वेळ खर्च करुन त्यावर आदेश करणे हे न्यायालयाचा व

पक्षकारांचा वेळे वाया घालवणे असे दिसुन येते सबब सदरचा अर्ज कॉस्टवर निकाली करण्याची विनंती केली आहे.

०५. अर्जदार यांनी दिलेला अर्ज, सामनेवाला यांनी दिलेले म्हणणे याचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. मुळ अर्जामध्ये अर्जदार क्र.३ बारकु विश्राम नटे हे मयत असुन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेताना मयत अर्जदार श्री.बारकु विश्राम नटे यांना नजरचुकीने अर्जदार क्र.५ असे संबोधण्यात आलेले असुन त्याऐवजी अर्जदार क्र.५ यांना मयत अर्जदार क्र.३ असे लिहिण्याची परवागनी मागितली आहे. अर्जदार यांनी अर्जाव्दारे मागणी केलेली दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची असुन सदरचा बदल झाल्याने मुळ अर्जामध्ये कोणताही बदल होणार नाही. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेले कारण संयुक्तीक असुन अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार क्र.३ बारकु विश्राम नटे यांना अर्जदार क्र.५ ऐवजी अर्जदार क्र.३ अशी दुरुस्ती करुन मुळ अर्जाची दुरुस्त प्रत अभिलेखावर मुदतीत दाखल करण्यात यावी.

२. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.20 17:28:54 +0530

महाड
दिनांकः२०.०९.२०२५

**(श्रीमती एच.आर.जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड